पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in


# प्रेसनोट

दिनांक :- ०७/०१/२०२२

## येवला शहरात छुप्या पध्दतीने विक्री होत असलेला नायलॉन मांजा हस्तगत ग्रामीण पोलीसांची कारवाई

नायलॉन मांजा वापराने माणसांना व पक्षांना होणा-या इजा व हानी हे दुष्परिणाम लक्षात घेता नायलॉन मांजा विक्री व वापरावर शासनाने बंदी घातलेली आहे. आगामी मकरसंक्रांत सणाच्या अनुषंगाने तसेच नायलॉन मांजाची छुप्या पध्दतीने होणा-या विक्रीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांचे आदेशान्वये कारवाई सुरू आहे.

त्याप्रमाणे दिनांक ०७/०१/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांना मिळालेल्या गुप्त बातमीनुसार येवला शहरात काही इसम छुप्या मार्गाने नायलॉन मांजा विक्री व वापर करत असल्याबाबत माहिती मिळाली, सदर बातमी मा.पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे विशेष पथकास सांगुन कार्यवाही करण्याचे आदेश दिले असता, पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकाने येवला शहरातील एस.टी बस डेपोच्या पाठीमागे, व्हाईड कॉलनी, अंबीषा दर्गाच्या पाठीमागील मोकळया जागेवर लोकांची गर्दी दिसल्याने आम्ही तेथे गेलो असता तीन इसम उभे राहुन नायलॉन मांजा व फिरक्या विकत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी छापा मारला असता, संशयीत इसम १) सादिक रफिक अन्सारी, २) अथर्व सुनिल भांबरे व ३) प्रसाद जगदिश हाबडे सर्व राहणार - येवला यांना ताब्यात घेतले. त्यांचे कब्जातुन नायलॉन मांजाने भरलेल्या ३०० फिरक्या अंदाजे किंमत रक्कम रूपये १,५०,०००/- चा मुददेमाल हस्तगत करण्यात आल्या असुन त्यांचे विरूध्द येवला शहर पोलीस ठाणेस कलम १८८, २९०, २९१, १३५ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन आरोपींना येवला पोलीसांनी ताब्यात देण्यात आले असुन त्यांचेवर पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे विशेष पथकातील पो.ना/विश्वनाथ काकड, पो.ना/सागर काकड व पो.कॉ/कुणाल मोरे यांनी सदरची कामगिरी केली आहे.